क्रमांक:एमएएम-१११६/सीआर-६०/२०१६/तीन दिनांक:१० ऑक्टोबर, २०१६

# घोषणा

**महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा - २०१६ अर्ज सादर करण्याबाबत**

जाहिरात क्रमांक १३/२०१६, दिनांक ६ एप्रिल, २०१६ नुसार आयोगामार्फत दिनांक १० जुलै, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा पूर्व परीक्षा - २०१६ चा निकाल दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात आले आहे.

**२.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक २१ ऑक्टोबर, २०१६** या कालावधीतच अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची अथवा परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

सु.ह. अवताडे
अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई

ठिकाण: मुंबई